संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# देशाच्या असंतुलित विकासाचा लंबक

**देशाच्या** विकासाचा समतोल म्हणजे काय हे स्वातंत्र्याच्या ७२ वर्षांनंतरही स्पष्ट होऊ शकलेले नाही. अलिकडच्या काही सर्वेक्षणांमधून देशाचा पश्चिमी भाग अधिक विकसित झाला. परंतु पूर्वोत्तर भाग त्यामानाने खूप दुर्लक्षित राहिल्याचे चित्र समोर आले आहे. आणि हा फरक तितक्याच ठळकपणे दिसूनही येतो. दक्षिणेत असलेल्या केरळ राज्यापासून जरी सुरुवात केली तरी केरळ, कर्नाटक, गोवा, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, पंजाब, हा संपूर्ण पश्चिम भागातला पट्टा औद्योगिक आणि आर्थिकदृष्ट्या बऱ्यापैकी विकसित झाला. केरळमध्ये सर्वाधिक साक्षरता असण्यापासून ते तिथल्या पर्यटनाची आज काश्मिरशी तुलना होते. काही कारणांमुळे काश्मिरमध्ये जर जाता येत नसेल तर अनेक पर्यटक केरळची निवड करतात. यावरून त्या राज्यातील सागरी किनाऱ्याशी निगडीत नैसर्गिक साधनसंपत्तीचा तिथल्या राज्यसरकारने भरपूर उपयोग करून घेतला किंबहुना कल्पकतेने विकासही घडवून आणला. कर्नाटकात खनिज संपत्ती बऱ्यापैकी आढळते. त्यावर आधारित उद्योग तिथे उभे राहिले. खाण उद्योग हा तर तिथल्या अर्थव्यवस्थेचा बराच मोठा आधार असल्याचे दिसून येते. याशिवाय बंगलोरसारखे महानगर आयटी हब म्हणून विकसित झाले आहे. देशातील सर्व प्रकारचे माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित उद्योग त्याठिकाणी एकत्रित झाल्याचे दिसून येते. बऱ्याच बहुराष्ट्रीय कंपन्यांनीसुद्धा बंगलोरची निवड केलेली पाहायला मिळते. त्यापाठोपाठ गोव्याचा झालेला पर्यटन आणि औद्योगिक विकास त्या राज्याच्या आकाराच्या मानाने खूपच वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. आज जगातील सर्वाधिक पर्यटक गोव्यामध्ये येतात. गोव्याची अर्थव्यवस्था ही पर्यटनआधारित आहे आणि त्यातूनच सर्वाधिक रोजगारही उपलब्ध झालेला आहे. या तीनही चारही राज्यांना मिळालेला सागरी किनारा त्यांच्यासाठी वरदान ठरलेला आहे किंबहुना त्यांनी त्याचा आर्थिक विकासासाठी उपयोग करून घेण्याचे कौशल्यही दाखवले. आकाराने लहान असलेली ही चारही राज्ये विकासाच्या क्षेत्रात मात्र बऱ्यापैकी आघाडीवर राहिली. महाराष्ट्राचा तर औद्योगिक विकासाच्या नकाशावर नेहमीच पहिला क्रमांक राहिला. शिक्षणात बऱ्यापैकी अग्रेसर राहिलेले महाराष्ट्र प्रबोधनाच्या किंवा सुधारणांच्या चळवळीत मात्र देशात आघाडीवर राहिले. ब्रिटिशांनी आपल्या राज्यव्यवहारात मुंबईला महत्वाचे स्थान दिले. परिणामी ब्रिटीश काळापासूनच सुधारणांचा श्रीगणेशा याठिकाणी अधिक प्रमाणात झाला. रेल्वे, कापडगिरण्या अशी बरीचशी उदाहरणे महाराष्ट्राबाबत देता येतील.

### जाणीवपूर्वक दुर्लक्ष

या राज्यांच्या अगदी उलट परिस्थिती तामिळनाडू, ओरिसा, पश्चिम बंगाल, किंबहुना पूर्वोत्तरातल्या आसाम, मणिपूर, मेघालय, नागालँड, सिक्कीम, पश्चिम बंगाल, या राज्यांबाबत अगदी ठळकपणाने दिसून येते. एकेकाळी ब्रिटीशांच्या ईस्ट इंडिया कंपनीचे मुख्यालय असलेल्या कलकत्यात आजही रिक्षा ओढण्याचे काम माणसं करतात. बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड आहे. अनेकवर्षे कम्युनिस्ट राजवट असूनही भूमीहीनांचे प्रश्न सुटू शकलेले नाहीत. ज्यांना आपण सेव्हन सिस्टर्स म्हणतो त्या त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, सिक्कीम, नागालँड, मिझोरम, मेघालय या राज्यांमध्ये तर दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या मूलभूत सोयीसुविधाही उपलब्ध नाहीत. चांगले रस्ते नाहीत. अजूनही शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होऊ शकत नाही. स्वयंपाकासाठी लागणारा गॅस मिळवणे म्हणजे आयुष्यातले सर्वात मोठे स्वप्न साकार झाल्याचे समाधान तिथल्या लोकांना मिळते. तिथल्या स्थानिक रुढी, परंपरा, चालीरिती यांचा उर्वरित भारताशी काही संबंध नाही असेच चित्र आतापर्यंत रंगवले गेले. ज्याप्रमाणात देशाच्या पश्चिम भागातील राज्यांचा औद्योगिक आणि आर्थिक विकास झाला त्या तुलनेत या पूर्व भागातील राज्यांचा झालेला नाही. म्हणूनच विकासाचे मापदंड लावताना अनेक स्तरावर देशाच्या पूर्व भागात विकासाचा सूर्य उगवलाच नाही असे म्हणण्याची वेळ येते. ७२ वर्षे झाली तरी निवडणुकांच्या काळात सगळे राजकीय पक्ष तिथे मतांचा जोगवा मागायला येतात पण नंतरच्या काळात आपल्याच देशाचा एक अभिन्न अंग असलेल्या या राज्यांचा अधिक वेगाने विकास व्हावा अशी कोणतीही धोरणात्मक योजना पाहायला मिळत नाही. राजकारणाचा लंबक पूर्वपासून पश्चिमेपर्यंत व्यवस्थितपणे फिरत असतो. परंतु असंतुलनाचे हे ठोके बघितल्यानंतर योग्य तो इशाराही मिळत असतो. म्हणूनच निवडणुकीचे ढोल बडवले जात असताना केवळ मतांवर डोळा ठेवून उपयोगाचे नाही. तर अगदी शास्त्रीयदृष्ट्या संपूर्ण देशाच्या संतुलित विकासाचे धोरण किंवा आराखडा मानला जायला हवा.

### दिल्ली नेहमीच दूर

निवडणुकीच्या निमित्ताने सगळ्याच राजकीय पक्षाने आपापले जाहीरनामे प्रसिध्द केले. परंतु कुठेही देशाच्या संतुलित विकासाचे अभ्यासपूर्ण विवेचन किंवा विश्लेषण अथवा धोरण कोणीही मांडलेले दिसत नाही. खरे तर या जाहीरनाम्याच्या निमित्ताने देशाच्या सामाजिक आर्थिक आणि राजकीय क्षेत्राचा आढावा घेतला गेला पाहिजे ज्यामध्ये रोजगार, औद्योगिक उत्पादन, त्या त्या राज्यातील सामाजिक प्रश्न, सांस्कृतिक विकासाची संकल्पना अशा अनेक अंगांना स्पर्श करणारे मुद्दे या जाहीरनाम्यातून अपेक्षित असतात. परंतु केवळ लोकांच अनुनय करणारी किंवा वेगवेगळी आमिषे अथवा आकर्षण दाखवून मते ओरबाडणारी आसूरी राजकीय प्रवृत्तीच त्यातून पाहायला मिळते. अगदी भारतीय जनता पार्टीच्या ७५ मुद्दे असलेल्या संकल्पातही या संतुलित विकासाचे आकडेवारीसह विश्लेषण केलेले नाही. गेल्या सत्तर वर्षात देशाचा हा पूर्व भाग गरिबी, दारिद्र्य आणि बेरोजगारी या समस्यामध्ये पिचत राहिल्याचे दिसून येते. असे होण्याचे प्रमुख कारण म्हणजे दिल्ली ही राजधानी ही देशाच्या पश्चिम भागालाच अधिक जवळची राहिली आणि या पश्चिमी राज्यांना दिल्ली हाकेच्या अंतरावरच उपलब्ध झाली परिणामी आपापल्या राज्यांचे प्रश्न सोडवून घेण्यात किंवा विकास करवून घेण्यात त्या त्या राज्यातील नेतृत्वानेही संधी साधून घेतली. किंवा आपल्या राजकीय वजनाचा पुरेपुर वापर करून घेतला याउलट मेघालय, त्रिपुरा यासारख्या राज्यांकडून दिल्ली ही राजधानी हजारो मैल दूर राहिली. या राज्यांचा आवाज दिल्लीपर्यंत पोहचला नाही. आणि पोहोचला तरी या राज्यांना तसा सन्मान देण्याचे सौजन्य दिल्लीनेही दाखवले नाही ही आज वस्तुस्थिती आहे.